मा. श्री भवरलाल जैन सो. (मोठे भाऊ)

किंमत ५० रूपये
वर्ष-२, अंक-१०, जानेवारी २०१६

# अॅग्रोवर्ल्ड

ध्यास... कृषी व ग्रामविकासाचा

प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## २०१६: नववर्षाभिनंदन!

# संशोधक शेतकरी विशेषांक


















## यशोगाथा


- शेतकरी बनला यंत्रांचा संशोधक
- देशी वाणांवर सखोल संशोधन
- संशोधनाची गोडी, उसात उतरली
- निश्चयाच्या बळावर ब्लोअर विकसित
- शेतीकामासाठी रोबोटची निर्मिती
- शेतीसाठी 'मृदा' संगणक प्रणाली विकसित
- निर्यातक्षम शेवगा वाण शोधले
- शेतीसाठी बहुपयोगी 'अॅग्रोस्कुटर'
- संशोधक वृत्तीतून पाच यंत्राची निर्मिती
- कांदा प्रतवारी यंत्राची शेतकऱ्याने केली निर्मिती
- प्रक्रिया उद्योगाने ज्वारीला मिळालं वैभव
- शेतकऱ्याने बनविले सौर ऊर्जेवर चालणारे फवारणी यंत्र

# 'अॅग्रोवर्ल्ड' २०१५ कृषी प्रदर्शन, अहमदनगर

## 'जैन इरिगेशन'चे उपयुक्त तंत्रज्ञान

या प्रदर्शनात पहिलाच स्टॉल जळगाव 'जैन इरिगेशन सिस्टीम' यांचा होता. ठिबक, तुषार, सौर ऊर्जा आदी विविध क्षेत्रात विकसित केलेले तंत्रज्ञान या स्टॉलवर शेतकऱ्यांना बघायला मिळाले. 'पर ड्रॉप...मोअर क्रॉप' या तत्त्वानुसार जैन इरिगेशन काम करीत असून शेतकऱ्यांना उपयुक्त असलेले तंत्रज्ञान देण्यात नेहमीच अग्रेसर आहे. या प्रदर्शनातही अशाच प्रकारचे तंत्रज्ञान ठेवण्यात आले. जैन टिश्युकल्चरची केळी आणि डाळिंबाची रोपे येथे शेतकऱ्यांना बघायला मिळाली. सौरऊर्जेवर चालणारा मोटरपंप दाखविणारी मोबाइल व्हॅन बघण्यासाठी शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. आगामी काळात या सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर करणे गरजेचा असल्याने उत्सुकतेसोबतच शेतकऱ्यांनी अनेक प्रश्न उपस्थितीत करत माहिती घेतली.

## 'केएफ बायोप्लँटस्'चा मनमोहक स्टॉल

प्रदर्शनात 'केए बायोप्लँटस्'चा सर्वात आकर्षक होता. कंपनीतर्फे विविध फुलांचे आणि फळभाज्यांच्या रोपांची निर्मिती करण्यात येते. विविध फुलझाडांची आकर्षक मांडणी केली असल्याने प्रदर्शनार्थी येथे आवर्जुन सेल्फी काढत होते. या ठिकाणी विविध रोपांचे वाण शेतकऱ्यांना बघायला मिळाले. फुलझाडांमध्ये जरबेरा, कार्नेशन, ग्लॅडिओलस्, आर्किड आदी तर, काकडी, टॉमॅटो आदी फळझाडांचे वाण येथे होते. या रोपांची किंमत उपलब्धतता याबाबत शेतऱ्यांनी आवर्जुन चौकशी केली.

## विविध पिकांसाठी 'प्लँटो कृषीतंत्र'

नगर हा जिल्हा प्रमुख्याने फळपिके, तसेच नगदी पिकांचे अधिकाधिक उत्पादन करणारा जिल्हा म्हणून ओळखल्या जातो. या प्रदर्शनात 'प्रलशर बायो प्रॉडक्ट्स' ने लावलेल्या स्टॉल्समध्ये विविध पिकांसाठी वापरले जाणारे 'प्लँटो कृषितंत्र' याबाबत माहिती उपलब्ध करून देण्यात आली होती. प्लँटो दाणेदार, पिस्टिम, झाईम, ड्रिप, मॅक्रो प्लस, बीटी, जैवीक अर्क आदी उत्पादनांची माहिती देण्यात आली. प्लँटा तंत्र हे ऊस, केळी, डाळिंब, पपई, लिंबू, संत्रा, मोसंबी, आंबा, कांदा व लसूण, गहू, भात, ज्वारी, मका, कपाशी, सोयाबीन, भुईमूग, हरभरा, दालवर्गीय, मिरची, वांगी, टोमॅटो, आले, हळद, बटाटा, सूर्यफूल, कलिंगड, खरबूज, कोबी, कॅप्सिकम आदी पिकांसाठी उपयोगी आहे. डाळिंबाच्या निर्यातक्षम उत्पादनासाठी हे तंत्र कसे फायदेशीर आहे याबाबतची माहिती असलेले पत्रकाद्वारे दिली. संपर्क : दू.क्र.- ०२५७-२२३५४६७, प्रलशर बायो प्रॉडक्ट्स प्रा. लि. गोवा-४०३७०६, ब्रँच : १०, प्रभात कॉलनी, जळगाव-४२५००२.

## 'श्रीराम अॅग्रो'चे पाईप, ड्रिप अन् फिल्टर

जळगाव जिल्ह्यातील रावेर येथे मुख्यालय असलेल्या 'श्रीराम अॅग्रो प्लास्ट इंडस्ट्रीज'च्या स्टॉलमध्ये सिंचनासाठी लागणाऱ्या साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. श्रीराम ठिबक, श्रीराम पाईप, श्रीराम स्प्रिंकलरचे सर्वप्रकारचे साहित्य येथे उपलब्ध होते. विविध आकारातील पीयुसी पाईप्स, ड्रिप लाटरल आणि फिल्टर याठिकाणी मांडण्यात आले होते. दिवसाच्या प्रदर्शन काळात हजारो शेतकऱ्यांनी या ठिकाणी भेट दिली. संपर्क : दू.क्र.०२५२८४-२५२५५८, श्रीराम चेंबर, सावदा रोड, रावेर जि. जळगाव -४२५५०८

## कृष्णाई मिल्किंग मशीन

दूध व्यवसायाला उपयुक्त यंत्र आणि साधनसामुग्रीचे उत्पादन कृष्णाई मिल्किंग मशिन या कंपनीतर्फे करण्यात येते. या कंपनीच्या मिल्कींग मशिनला देशभरात या विशेष मागणी आहे. या मशिनद्वारे दूध काढणी सहजसोपे जाते. प्रदर्शनात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कंपनीच्या स्टॉलवर चौकशी केली.

## 'ड-लवाल'ची दुग्धउत्पादन सामुग्री

दुग्धव्यवसायासाठी जगभरात बनविल्या जाणाऱ्या विविध मिल्किंग मशिनमध्ये 'ड-लवाल'ची मिल्किंग मशिन ही एक अग्रगण्य समजली जाते. स्वीडन देशातल्या या कंपनीने भारतात देखील आपल्या व्यवसायाचा विस्तार केला आहे. भारतभर या कंपनीची व्याप्ती असून मिल्किंग मशिन बनविण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा कंपनीने वापर केला असल्याचा कंपनीचा दावा आहे. या प्रदर्शनात विविध आकारातील आणि वेगवेगळ्या किंमतीचे दूध काढणी यंत्र ठेवण्यात आले होते. या यंत्रासोबतच मॅट, ब्रश आदी साहित्य देखील मांडण्यात आले होते.

## गरवारे वॉल रोप नियंत्रित शेतीचा सक्षम मार्ग

जागतिक तपमान बदलाच्या युगात शेतीक्षेत्र शाश्वत राहिले नाही. शेतीक्षेत्र शाश्वत करण्यासाठी नियंत्रित शेतीतील पॉलीहाऊस , शेडनेट हाऊस आदी विविध प्रकार भारतात कात टाकत आहेत. नियंत्रित शेतीद्वारे शाश्वत शेतीला चालना मिळवून देण्याचे काम गरवारे वॉलरोपच्या माध्यमातून केले जात आहे. गरवारे वॉल रोपच्या वतीने, पक्षीरोधक जाळी, ॲन्टी हेल नेट, शेड नेट, पिकसंरक्षक जाळी, द्राक्ष जाळीचे निर्माण केले जात आहे.मत्स्य शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने मासे पकडण्याच्या अनेक जाळ्या कंपनीच्या वतीने निर्माण केल्या जातात. शेततळ्यांसाठी अवश्यक असलेले कागद देखील कंपनीच्या वतीने निर्माण केले जातात. अधिक माहितीसाठी गरवारे वॉल रोपस लिमिटेड प्लॉट नं ११, ब्लॉक डी१ एम.आय.डी.सी चिंचवड पुणे ४११०१९, फोन क्र : +९१२०३०७८०००० या क्रमांकावर संपर्क साधावा .

## स्टेट बँक ऑफ इंडीयाची विशेष कर्ज योजना (कृषी) विशेष कर्ज योजना (कृषी)

स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या खास शेतकऱ्यांसाठी फळबाग विकास योजना, ट्रॅक्टर कर्ज योजना या सारख्या अनेक योजना सध्या कार्यान्वीत आहेत. बँकेच्या वतीने पोल्ट्री व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्यांसाठी विशेष कर्ज योजना (कृषी) या अंतर्गत लेअर ब्रॉयलर पोल्ट्री सुरु करण्यासाठी कर्ज देण्याची तरतुद आहे. या योजनेअंतर्गत शीतगृह, फार्म हाऊस किंवा गोडावून बांधकाम, हरीत गृह निर्माण या साठी देखील कर्ज देण्याची तरतुद आहे. स्टेट बँकेच्या वतीने शेतकरी गटांना विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी भारतीत स्टेट बँकेच्या नजीकच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

भारतीय स्टेट बैंक
State Bank of India
हर भारतीय का बैंक
THE BANKER TO EVERY INDIAN

## सौर कृषिपंप पुरवठ्याचे 'जैन इरिगेशन'ला आदेश

**जळगाव** : राज्याच्या विविध भागात ८ हजार ९५९ कृषिपंपाचा पुरवठा व त्याचे इन्स्टॉलेशन 'जैन इरिगेशन' करणार आहे. राज्य सरकारतर्फे सौर ऊर्जेवर चालणाऱ्या कृषिपंपाचा पुरवठा करण्यासाठी 'जैन इरिगेशन'ला ४७३ कोटी रुपयांचे पुरवठा आदेश दिले आहेत. शासनाने ५ लाख सोलर पंप बसवण्याचा निर्धार केला आहे. जगातला हा सर्वात मोठा सौर कृषिपंपाचा प्रकल्प असून शासन राज्य वीज वितरण कंपनीतर्फे राबविणार आहे.

शासनाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात वीस जिल्ह्यांचा समावेश असून यात सर्वाधिक दूष्काळग्रस्त क्षेत्राचा समावेश आहे. बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यातही विविध भाग यात आहेत. यात ३, ५ आणि ७.५ एचपी क्षमतेचे पंपसेट बसविण्यात येणार असून यात ४ हजार ५५९ एसी पंपस् तर ४ हजार ४०० डीसी पंपस् आहेत. लाभधारक शेतकऱ्यांच्या जवळ असलेल्या पाणी गरजेनुसार व त्यांच्या जवळ असलेली शेतजमीन व पीक रचना आदी बाबींवर अवलंबून असेल.

सोलर कृषीपंपाच्या क्षेत्रात मागील अनेक वर्ष 'जैन इरिगेशन'ने सातत्य ठेऊन संशोधनात मोठे यश साध्य केले. या संशोधनाच्या बळावर जगात सर्वप्रथम डीसी सोलर कृषीपंपाची निर्मिती केली. यासाठी लागणारे सोलार पॅनल, कंट्रोलर्स, पंपस्, स्क्रीनपाईपस्, केसींगपाईपस्, फिल्टर्स आदि सर्व प्रणालीची कंपनीतर्फे निर्मिती केली जाते. या क्षेत्रातील सर्व साहित्याच्या उत्तम निर्मितीचा दांडगा अनुभव कंपनीच्या पाठीशी आहे. मागील काहीवर्षात कंपनीने भारतभर ९ राज्यात सुमारे १५ हजारपेक्षा अधिक सोलर कृषिपंप लावून ते कार्यान्वित केले आहेत.

## हरभरा पिकावर हिरव्या अळीचा पादुर्भाव

**औरंगाबाद** : तूर पिकावरील हिरवी बोंडअळी (हेलीकोव्हर्पा) सध्या हरभरा पिकावर सुद्धा आढळून येत आहे. ही अळी पानातील हरितद्रव्य खात असल्याने पानांचा हिरवा रंग नाहीसा होऊन रोपे पांढरट दिसतात. अशी माहिती औरंगाबाद उपविभागाचे कीड नियंत्रणक सुदाम काकडे यांनी दिली.

या अळीच्या नियंत्रणासाठी वनस्पतीजन्य किटकनाशकामध्ये निमर्कांची आणि दशपर्णी अर्काची फवारणी प्रभावी आहे. पक्षी थांबे, कामगंध सापळ्यांचा उपयोग देखील करावा. सोबतच पांढऱ्या राखेची धुरळणी उपयोगी आहे. जैविक किटकनाशकामध्ये १० मि.ली. एचएनपीव्ही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी करताना त्या द्रावणात ५ ते १० मि.ली. निळ मिसळावी. या किडनाशकाने मेलेली अळी झाडाला उलटी लटकते आणि खाली पडते. या अळ्या हाताने वेचून रगडून त्यापासून पुन्हा एचएनपीव्ही किडनाशक बनविता येते. बॅसीलस बिव्हेरिया हे बुरशी नाशकही अळीच्या नियंत्रणासाठी प्रभावी आहे.